अमरावती दि.१८.१०.२०१९

## प्रेस नोट

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यक्षेत्रात अमरावती, बडनेरा, तिवसा आणि धामणगांव रेल्वे असे विधानसभेचे कार्यक्षेत्र असुन एकूण २६६ इमारती मध्ये ७३५ बुथ आहेत. यापैकी १७७ बुथ हे संवेदनशिल असल्याने,त्याप्रमाणे निवडणूक बंदोबस्त ठरविण्यात आलेला आहे. संवेदनशिल ठिकाणे व अमरावती आयुक्तालयासाठी एकुण ३ केंद्रीय राखीव पोलीस दल प्राप्त झाले आहेत. RPF,CISF आणि MPSAP या पलिकडे पोलीस आयुक्तालयातील १७५० कर्मचारी,महाराष्ट्र पोलीसांचे ४०० होमगार्ड आणि मध्यप्रदेशातील एकूण ६०० होमगार्ड असे कर्मचारी बंदोबस्तासाठी प्राप्त झालेले आहेत.

मागणीपेक्षा बंदोबस्त अधिक मिळालेला असुन पोलीस आयुक्तालयातील निवडणूक बंदोबस्ताची अत्यंत चोखपणे आखणी करण्यात आलेली आहे. पोलीस आयुक्त श्री. संजयकुमार बाविस्कर साहेब यांनी आगामी विधानसभा निवडणूकीची तयारी सुरुवातीपासूनच केलेली होती. मागील काही महिण्यात गणेश उत्सव, दुर्गा उत्सव आणि विधानसभा निवडणूक तसेच सर्व सण/उत्सव लक्षात घेऊन मोठया प्रमाणात गुन्हेगांरावर प्रतिबंधक कार्यवाही कलेली आहे. यात प्रामुख्याने १०२ लोकांना तडीपार करण्यात आलेले आहे. सुमारे ३४८ लोकांवर कलम १०७ प्रमाणे, ३० लोकांवर कलम ११० प्रमाणे आणि ८० लोकांना तात्पूरती तडीपारीची कार्यवाही तसेच ६ लोकांना MPDA अंतर्गत कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच कलम १५१(१) आणि कलम १५१ (३) अंतर्गत मोठया प्रमाणात कारवाई करण्यात येत आहे.

आचारसंहिता लागल्यापासून ९ देशीकट्टे, १३ राऊंडस् जप्त करण्यात आले असून ३ तलवारी, १-कूकरी आणि चाकू-१० जप्त करण्यात आले असून लाखो रुपयांची दारु पकडलेली आहे. आयुक्तालयातील संवेदनशिल क्षेत्रामध्ये सुमारे RPF-CISF-MPSAP या तीन कंपनींचे ३० Sector मध्ये दिनांक २० व २१ ऑक्टोबंर २०१९ रोजी तैनात करण्यात आले आहेत, त्याचप्रमाणे अवैध दारु विक्री करणारे, मतदारास प्रलोभण देण्यासारख्या प्रकारांवर आळा घालण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आलेली आहेत. तसेच १३ Flying Squad तसेच ८ ठिकाणी नाकाबंदी चालू आहे. जास्तीत जास्त नॉन

Scanned by CamScanner

बेलेबल वॉरंटची बजावणीसाठी निवडणूक काळात पथके तयार करण्यात आलेली आहेत. ३० ठिकाणी सशस्त्र पोलीसासह फिक्स पॉईंट नेमण्यात आले आहे. संपूर्ण पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात पोलीस उप आयुक्त-३, सहायक पोलीस आयुक्त-९ पोलीस निरीक्षक- ३७ आणि ८५ सहायक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक निवडणूकी बंदोबस्तासाठी अधिकारी कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही दडपणास , प्रलोभनास बळी न पडता निर्भीडपणे आपला राज्यघटनाप्राप्त मतदानाचा हक्क बजवावा. निवडणूकीत व्यस्त असलेले सर्व शासकिय अधिकारी व कर्मचारी यांनी निवडणूक कर्तव्य अत्यंत पारदर्शक, भयमुक्त व निःपक्षपाती वातावरणात पार पाडावे अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतदानाची टक्केवारी मध्ये वाढ व्हावी यासाठी सर्वतो परी प्रयत्न केलेले आहेत. अमरावती आयुक्तालय क्षेत्रातील नागरिकांनी मोठया प्रमाणात मतदानाचा हक्क बजावून इतिहासात नोंद होईल असा प्रयत्न करावा. निवडणुक करीता जवळपास १२० चारचाकी वाहने तयार असून बंदोबस्ताचे अनुषंगाने मतदान क्षेत्रात कार्यरत राहतील.

पोलीस आयुक्त
अमरावती शहर करीता

Scanned by CamScanner